**10% Discount for Commuters of Mumbai Metro on Lok Sabha General Election 2024 Voting Day in Mumbai**

**MMMOCL accomplishes the duty of upholding democracy, alongside adding convenience to the travels of voters.**

**"Maha Mumbai Metro's initiative to boost voter turnout through 'SVEEP' program"**

**Mumbai, 3rd May 2024:**

Passengers of Metro Lines 2A and 7 are about to get a special 10% discount on 20th May 2024, the Voting Day of the Lok Sabha General Election 2024. Commuters of Mumbai Metro, utilizing Mumbai 1 Card, Paper QR, and paper tickets will enjoy the privilege to travel to the polling stations and return home after voting with a special discount of 10% on a base fare. Mumbai Metro aspires to promote the interest of Mumbaikars towards voting through this valuable initiative, and as the ridership at Mumbai Metro has already soared as high as 90 million, this fortuitous event will further enhance the utility of Metro Lines towards the transportation needs of the MMR.

People residing across the Mumbai Metropolitan Region will be travelling from different corners to cast their votes on the Voting Day of the Lok Sabha General Election 2024. Thus, on 20th May 2024, Mumbai Metro has taken up the noble initiative of offering discounts to its value commuters. This meaningful direction permits the citizens of the MMR to reach their destined voting stations and fulfil their responsibility to democracy with an added level of convenience. Moreover, this intuitive step makes passengers feel more satisfied with the services of Mumbai Metro.

Maha Mumbai metro is actively participating in Sveep - systematic voter education and electoral participation to encourage metro riders to fulfill their civic duty and vote in elections. This initiative aims to motivate citizens to contribute to the nation by exercising their right to vote.

**निवडणुकीच्या दिवशी मेट्रो प्रवाशांना तिकिटावर मिळणार १० टक्के सवलत**

**लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर महामुंबई मेट्रो प्रशासनाचा निर्णय**

**नागरिकांना मतदान केंद्रावर विनाव्यत्यय पोहचता यावे यासाठी महामुंबई मेट्रोचा निर्णय**

**मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी महामुंबई मेट्रो 'मतदार जागरूकता आणि सहभाग (SVEEP) उपक्रमात सहभागी**

**मुंबई, ३ मे,२०२४:**

मुंबई मेट्रो मार्ग २ अ आणि ७ च्या सर्व प्रवाशांना २० मे, २०२४ रोजी प्रवासी तिकिटावर (मूळ तिकिटदरावर) १०% सवलत देण्याचा महत्त्वाचा निर्णय महामुंबई मेट्रो संचलन महामंडळाने घेतला आहे. ही सवलत मुंबई मेट्रो १ कार्ड, मोबाईल क्यूआर तिकीट, पेपर तिकीट अशा सर्व माध्यमातून देण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो मार्ग २ अ आणि ७ च्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ९० कोटी नागरिकांनी प्रवास केला असल्याने मुंबई मेट्रोचा उपयुक्तता अधोरेखित झाली आहे.

मुंबई मध्ये लोकसभा निवडणूक - २०२४ च्या पाचव्या टप्प्यातील मतदान २० मे, २०२४ रोजी पार पडणार आहे. खर तर हा लोकशाहीचा उत्सव आहे. मतदार म्हणून मतदान करण्याकरीता या उत्सवात लोकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूकपणे सहभाग वाढावा यासाठी शासनामार्फत सर्व स्तरातून जनजागृती करण्यात येत आहे. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नागरिकांना मेट्रोच्या माध्यमातून आरामदायक प्रवास करत, मतदानाचा आपला हक्क बजावता यावा यासाठी महामुंबई मेट्रो प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

लोकसभा निवडणुक २०२४ मध्ये मतदान करण्यासाठी मेट्रो प्रवाशांना प्रोत्साहित करून त्यांच्या मतदानाच्या कर्तुत्वाबाबत जाणीव करून देण्यासाठी, महामुंबई मेट्रो मतदार जागरूकता आणि सहभाग (SVEEP) या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत आहे. मुंबई मेट्रोने जास्तीत जास्त नागरिकांनी प्रवास करावा या दृष्टीने महामुंबई मेट्रो प्रयत्नशील आहे.  या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करता येईल आणि त्यांना  केंद्रापर्यंत आरामदायक प्रवास करता येणार आहे.

